प्रशासकीय मान्यता
३ टेस्ला एमआरआय सिस्टम मशिन टर्न की सह परत खरेदी (बाय बॅक) ऑफ ओल्ड मशीन पध्दतीने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : जीएचएन-२०१९/प्र.क्र.२२०/प्रशा-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०१९

वाचा :
१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी -२०१६ / प्र.क्र. २४० / आरोग्य -८, दिनांक २६.०७.२०१७
३) सदस्य सचिव प्रबंधन समिती, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी,नागपूर यांचे पत्र क्रमांक जि.ख.प्र/ कार्या-२१ /२०१९ /२७१, दिनांक १३.०८.२०१९
४) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/ शावैमवरू नागपूर /जिखप्रट्रना / २०१९-२० / ३- म / १२५०३ /२०१९ ,दिनांक ३०.०८.२०१९

शासन निर्णय :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस जिल्हा खनिज प्रतिष्ठान यांच्या उपरोक्त दिनांक १३.०८.२०१९ च्या पत्राच्या रुपये १५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंधरा कोटी फक्त) इतक्या रकमेची ३ टेस्ला एमआरआय सिस्टम टर्न की सह परत खरेदी (बाय बॅक) ऑफ ओल्ड मशीन खालील तक्त्यात दर्शविलेल्या तपशीलानुसार खरेदी करण्यास या शासन निर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	यंत्राचे नांव	नग	प्रति नग किंमत	एकूण किंमत
१	३ टेस्ला एम.आर.आय. सिस्टीम टर्न की सह परत खरेदी (बाय बॅक) ऑफ ओल्ड मशीन	०१	१५,००,००,०००	१५,००,००,०००
	एकूण			**१५,००,००,०००**

अटी :-

१. सदर प्रशासकीय मान्यता जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांच्यामार्फत निधी उपलब्ध होण्याच्या अटीन राहून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मिती व बांधकामाची आवश्यकता नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा केलेली आहे.

३. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक आयएचएन-२०१८/प्र.क्र.२९३/प्र.क्र.२९३/प्रशा-१, दिनांक ०७.०३.२०१९ नुसार करावी.

५. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, असे संचालक (वै.शि.) यांनी प्रमाणित करावे.

७. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.

८. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

९. सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे अनुपालन करावे. सदर तरतूदीचे अनुपालन केलेल्या यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. या प्रयोजनासाठी सदर संस्थेस जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांच्यामार्फत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८३११७३६४५६७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.08.31 18:36:23 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - २ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी , नागपूर.
४. सदस्य सचिव, प्रबंधन समिती, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी नागपूर
५. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
६. अधिष्ठाता, शासकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर.
७. जिल्हा कोषागार अधिकारी,नागपूर.
८. निवडनस्ती (प्रशा-१).